# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ( १९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail :gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/५३५४/२०२१ दिनांक २३/०६/२०२१

## परीपत्रक

(स्मरणपत्र)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :— शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन आकारण्यात आलेल्या विविध शुल्काबाबत

संदर्भ :— १. विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि./म. वि./२१९३/२०२१ दिनांक २९/०५/२०२१
२. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे पत्र क्रमांक जा. क्र. सआसक/विद्यापीठ/विविध शुल्क आकारणी वर्ष २०—२१/१३७० दिनांक २९/०४/२०२१

महोदय,

उपरोक्त नुसार संदर्भ क्रमांक १ च्या विद्यापीठाच्या परीपत्रकाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन कारोना —१९ च्या काळात विद्यार्थ्याची उपस्थिती प्रत्यक्ष कमी असुन या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षण पुर्ण केलेले असुन सुध्दा महाविद्यालयांनी लॅबोरटरी फी, ग्रंथालय शुल्क, विद्यार्थी खेळ व क्रिडा निधी, अभ्यासेत्तर उपक्रम, वैद्यकिय तपासणी शुल्क, शारीरीक कार्यक्षमता तपासणी फी, विद्यापीठ क्रिडा व सांस्कृतीक शुल्क, वैद्यकिय तपासणी अर्ज शुल्क, अश्वमेध शुल्क ईत्यादीबाबतचे आकारण्यात आलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्याबाबत व त्याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठाला सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु आजतागायत अनेक महाविद्यालयांनी सदर बाबतची कार्यवाही पुर्ण न केल्यामुळे अजुनही विद्यार्थी संघटनांच्या तक्रारी विद्यापीठाला प्राप्त होत आहे.

करीता सर्व प्राचार्यांना या परीपत्रकाव्दारे पुनश्च: सुचित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२०—२१ बाबतची मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन आकारण्यात आलेली शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे व त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठाला सादर करावा. अन्यथा शासनाकडुन होणाऱ्या पुढील कार्यवाहीस सदर महाविद्यालयाचे प्रशासन जबाबदार राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

२३/६/२०२१

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :—१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२.मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /2193/ 2021 दिनांक: 29/05/2021

## (परीपत्रक)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन आकारण्यात आलेल्या विविध शुल्काबाबत
संदर्भ :– महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे पत्र क्रमांक जा. क्र. सआसक/विद्यापीठ/विविध शुल्क आकारणी वर्ष २०–२१/१३७० दिनांक २९/०४/२०२१ प्राप्त दिनांक ०४/०५/२०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, सत्र २०२०–२१ या शैक्षणिक सत्रात कोरोना–१९ या रोगाच्या साथीमुळे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रत्यक्ष कमी असुन या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षण पुर्ण केलेले आहे. परंतु विद्यापीठाशी सलंग्नित काही महाविद्यालयांनी कोरोना –१९ च्या काळात सुध्दा मागावर्गीय विद्यार्थ्यांकडुन लॅबोरटरी फी, ग्रंथालय शुल्क, विद्यार्थी खेळ व क्रिडा निधी, अभ्यासेत्तर उपक्रम, वैद्यकिय तपासणी शुल्क, शारीरीक कार्यक्षमता तपासणी फी, विद्यापीठ क्रीडा व सांस्कृतीक शुल्क, वैद्यकिय तपासणी अर्ज शुल्क, अश्वमेघ शुल्क इ. शुल्काची आकारणी करण्यात आलेली दिसुन येत आहे.

करीता आपणांस सदर परीपत्रकाव्दारे सुचित करण्यात येत आहे कि, आपल्या महाविद्यालयांत याबाबत कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले असल्यास सदर फी विद्यार्थ्यांना परत करुन त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठाला कळविण्यात यावा जेणेकरुन याबाबतची माहीती शासनास पुरविणे व विद्यापीठाकडुन पुढील कार्यवाही घेणे सोईचे होईल.

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशान्वये

(डॉ. जी. डी. दुबे )
उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र –संलग्नित उपरोक्तप्रमाणे

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
कार्यालय :- सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर
Email :- chasdswo@gmail.com Phone No.:- 07172-253198

जा.क्र.सआसक/विद्यापीठ/विविध शुल्क आकारणी वर्ष २०-२१ /२०२०-२१/ 1370 दि. २९.०४.२०२१

प्रति,

मा. कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स- ४४२६०५

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेल्या विविध शुल्काबाबत.

संदर्भ :- १. चिंतामणी कॉलेज ऑफ सायन्स, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
२. चिंतामणी कॉलेज ऑफ कॉमर्स, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
३. चिंतामणी आट्‌र्स कॉलेज, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
४. चिंतामणी आट्‌र्स ॲन्ड सायन्स कॉलेज, गोंडपीपरी जि. चंद्रपूर
५. आट्‌र्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, गोंडपीपरी जि. चंद्रपूर
या महाविद्यालयांना देण्यात आलेली भेट दिनांक १६.०४.२०२१

उपरोक्त संदर्भांकित विषयी सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयाकडून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क योजना राबविण्यात येत असून अनु. जाती, इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकरीता शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम महाविद्यालयांना अदा करण्यात येते.

या कार्यालयाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती रक्कम ज्या बाबीसाठी देण्यात येते त्या सोई-सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी देणे आवश्यक आहे. तसेच दिलेल्या शिष्यवृत्ती रकमेचा उचित विनियोग करण्यात येते किंवा कसे? याबाबत तपासणी करण्याचे अधिकार या कार्यालयास आहेत.

त्या अनुषंगाने दि. १६.०४.२०२१ रोजी उपरोक्त संदर्भांकित महाविद्यालयांची या कार्यालयाकडून तपासणी केली असता सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरविण्यात आलेल्या नाही, तसेच ज्या बाबींचे/कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले नाही त्या बाबींचे शुल्क आकारणी करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात कोरोना-१९ रोगाच्या साथीमुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती कमी असून या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलॉईन शिक्षण पुर्ण केलेले आहे. तथापी आपले विद्यापीठाकडून **लॅबोरटरी फी, ग्रंथालय शुल्क, विद्यार्थी खेळ व क्रिडा निधी, अभ्यासेत्तर उपक्रम, वैद्यकीय तपासणी शुल्क, शारीरीक कार्यक्षमता तपासणी फी, विद्यापीठ क्रिडा व सांस्कृतिक शुल्क, वैद्यकिय तपासणी अर्ज शुल्क, अश्वमेघ यज्ञ शुल्क इ.** शुल्काची आकारणी करण्यात आलेली आहे.

सदर शैक्षणिक वर्षात उपरोक्त बाबींचे आयोजन महाविद्यालस्तरावर करण्यात आलेले नाही व त्यांचे शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे. सदर बाब संयुक्तीक वाटत नाही. कोरोना -१९ साथरोगाच्या अनुषंगाने ज्या बाबींचे महाविद्यालयांनी आयोजन केले नाही. त्या सुध्दा रकमेची अनु. जाती, इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्ज प्रस्तावात मागणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर बाबतीत शासनाचा

अनावश्यक खर्च झालेला आहे. तरी आपले अधिनिस्त महाविद्यालयांना सदर शुल्क शासन जमा करणेबाबत सुचित करण्यात यावे ही विनंती.

कोराना साथरोगाच्या कालावधीमध्ये आर्थिक परिस्थितीवर परिणाम झाल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक शुल्कात सुट देणे आवश्यक आहे. असे असतांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्कात सुट देणे अपेक्षित होते परंतु आपणाकडून संपुर्ण शुल्काची आकारणी करण्यात आलेली आहे त्यामुळे शासनावर/विद्यार्थ्यांवर नाहक आर्थिक भार पडलेला आहे. तरी उपरोक्त प्रमाणे अनावश्यक बाबींवर आकारणी करण्यात आलेले शुल्क शासनास परत करण्यात यावे. अशी या कार्यालयाची धारणा आहे. इतरी पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

आपला विश्वासू,

(अमोल मो. यावलीकर)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, चंद्रपूर

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म. रा., पुणे-०१
३. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर

स्वा/-
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, चंद्रपूर